MHWS090005532017

| | | |
|---|---|---|
| दाखल दिनांक | : | १९/०९/२०१७ |
| नोंदणी दिनांक | : | १९/०९/२०१७ |
| निकाल दिनांक | : | २८/०५/२०२६ |
| कालावधी | | वर्ष महिना दिवस<br>०८ ०८ ०९ |

## न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग (न्यायालय क्र.१) मानोरा यांचे न्यायालयात

(पिठासीन अधिकारी : ज. तु. कोरेगांवकर)

सीएनआर नं.एमएचडब्ल्युएस : ०९०००५५३२०१७
म.सं.कौ.हिं.का. अर्ज क्र. : ३६/२०१७
निशाणी क्रमांक : ५२

१. सौ. आशा संतोष सोनोने )
वय अं.: ३४ वर्ष, धंदा : घरकाम )
२. कु. मनस्वी संतोष सोनोने )
वय अं.: १० वर्ष, धंदा : शिक्षण )
३. कु. भुमिका संतोष सोनोने )
वय अं.:७ वर्ष, धंदा : शिक्षण )
(अर्जदार क्र.२ व ३ तर्फे अ.पा.क. आई अ.क्र.१) ) .
रा. सैनिक कॉलनी, बोरकर यांचे घराजवळ, )
अमरावती रोड, दर्यापुर, ता.दर्यापुर, जि.अमरावती. )
ह.मु. द्वारा गं.भा. पंचफुला कुंडलिक सवंदळे ) ....अर्जदार
रा. जुनी वस्ती, मानोरा, ता.मानोरा, जि.वाशिम.

विरुध्द

१. संतोष रमेश सोनोने )
वय अं.: ३८ वर्षे, धंदा : नोकरी )
रा. सैनिक कॉलनी, बोरकर यांचे घराजवळ, )
अमरावती रोड, दर्यापुर, ता.दर्यापुर, जि.अमरावती.

२. रमेश रुंजाजी सोनोने )
वय अं.: ७० वर्षे, धंदा : सेवा निवृत्त/शेती, )

३. सौ. उषा रमेश सोनोने )
वय अं.: ६५ वर्षे, धंदा : घरकाम )
गै.अ.क्र.२ व ३ रा. द्वारा–रुपाली श्रीकृष्ण माने )
रा. ड्रिमलॅन्ड सिटी, दर्यापुर, ता.दर्यापुर, जि.अमरावती

४. उमेश रमेश सोनोने )
वय अं. : ३५ वर्षे, धंदा : शेती )
रा. वरुड कुलट, ता. दर्यापुर, जि.अमरावती ) ....गैरअर्जदार

अर्जदारांतर्फे विधीज्ञ : श्री. टी. ए. खान पटेल
गैरअर्जदारांतर्फे विधीज्ञ : श्री. एस. एन. पखाले

कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ चे कलम १२, १८, १९, २०, २२ व २३ प्रमाणे.

## न्यायनिर्णय

(घोषीत दिनांक १४ मे, २०२६ रोजी )

अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ चे कलम १२, १८, १९, २०, २२ व २३ प्रमाणे दाखल केला आहे.

अर्जदाराचे अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे –

२. अर्जदार क्र.१ हिचे लग्न गैरअर्जदार क्र.१ सोबत दि. २४.०५.२००६ रोजी जुनी वस्ती, मानोरा ता. मानोरा जि.वाशिम येथे संपन्न झाले. लग्नाचा संपूर्ण खर्च म्हणून गैरअर्जदार क्र.१ याला रुपये ३१,०००/– देण्यात आले होते व आंधण म्हणून जीवनोपयोगी भेटवस्तु तसेच तिच्या आई–वडीलांनी तिला सोन्या–चांदीचे दाग–दागिने किंमत अंदाजे २०,०००/– चे दिले होते तसेच लग्नाचा एकूण खर्च २०,०००/– केला होता. लग्नानंतर ती गैरअर्जदारांकडे त्यांच्या एकत्र कुटुंबात नांदावयास गेली होती. त्यावेळी गैरअर्जदारांनी सुरुवातीचे पंधरा दिवस तिला चांगली वागणुक दिली. त्यानंतर गैरअर्जदार क्र.१ हा गैरअर्जदार क्र.२ व ४ च्या सांगण्यावरुन तिला त्रास देण्यास सुरुवात केली. गैरअर्जदार क्र.१ हा त्यावेळी धारणी येथे कृषी विभागामध्ये कृषी सेवक म्हणून कार्यरत असतांना तो तेथेच राहत होता. घरी आल्यानंतर गैरअर्जदार क्र.१ हा दारुच्या नशेत तिला मारहाण करीत होता व तिचेवर संशय घेवून तिला पाप लावित होता. अर्जदार क्र.१ ही गैरअर्जदार यांचेकडे नांदत असतांना लग्नाच्या सहा महिन्यामध्ये तिला शासकिय रुग्णालयात ए.एन.एम.सहाय्यक परिचारीका म्हणून काळशी येथील उपकेंद्र काळशी पि.एच.सी. दर्यापुरला नौकरी लागली त्यामुळे ती काळशी येथील शासकिय निवासस्थानामध्ये तिच्या ननंद रुपाली सोबत राहण्यास गेली. तिला नौकरी

लागल्यानंतर गैरअर्जदार क्र.१ हा तिचेवर जास्तच संशय घेत होता व तिला पाप लावत होता. अशातच ती गैरअर्जदार क्र.१ पासून गर्भवती राहीली व तिने दि.०५.११.२००७ रोजी अर्जदार क्र.२ ला जन्म दिला. तिच्या प्रसुतीचा संपूर्ण खर्च तिच्या आई–वडीलांनीच केला. वर्ष २००८ मध्ये गैरअर्जदार क्र.१ ची बदली होवून ते दर्यापुर येथे आला. त्यावेळी अर्जदार क्र.१ हिने तिची बदली मौजा भामोद येथे करुन घेतल्यामुळे गैरअर्जदार क्र.१ हा तिच्यावर जास्तच संशय करु लागला. दि.११/०३/२००९ रोजी गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदार क्र.१ हिला चांगले वागणुकीचा करारनामा लिहून दिला. त्यानंतर गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदार क्र.१ हिस कोऱ्या कागदावर सही घेतली व तिला नोकरी सोडायला लावली. त्यानंतर अर्जदार क्र.१ हिने दि.१८/१२/२०१० रोजी पुन्हा अर्जदार क्र.३ हिस जन्म दिला. त्यानंतर अर्जदार क्र.१ ही गैरअर्जदार क्र.१ सोबत नविन घरात राहण्यास गेली असता गैरअर्जदार क्र. २ ते ४ दर्यापुर येथे येत होते व गैरअर्जदार क्र.१ ला तिचेबद्दल भडकावून देत होते. त्यामुळे गैरअर्जदार क्र.१ हा दारु पिवून अर्जदार क्र.१ हिस मारहाण करीत होता. त्यामुळे अर्जदार क्र.१ ही जुन २०१४ मध्ये दोन्ही मुलींसही तिच्या माहेरी आली. त्यांनतर दि.१५.११.२०१४ रोजी पुन्ही गैरअर्जदार क्र.१ याने चांगल्या वागणुकीचे हमीपत्र लिहून दिले व त्यांना घरी घेवून गेला. त्यानंतर गैरअर्जदार क्र.१ हा पाच–सहा महिने माहेरी का राहीली या कारणावरुन परत दारुच्या नशेत मारहाण करीत होता. दि.२५.११.२०१६ व २६.११.२०१६ रोजी अर्जदार क्र.१ हिला गैरअर्जदार क्र.१ याने बेदम मारहाण केली व अर्जदारांना कोंडून ड्युटीवर निघून गेला. त्यानंतर अर्जदार क्र.१ ही माहेरी निघून आली. गैरअर्जदार क्र.१ हा अर्जदार क्र.१ च्या माहेरी गेला व तेथे तिच्या आई–वडील व बहिण यांना शिवीगाळ केली व जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या. त्यामुळे अर्जदार क्र.१ हिने पो.स्टे. मानोरा येथे रिपोर्ट दिला.

३. अर्जदार क्र.१ हिचे पुढील कथन असे की, अर्जदार क्र.१ ही माहेरी राहत असुन अर्जदार क्र.२ व ३ ह्या शिकत आहेत. त्यांना शिक्षणाकरीता खर्च लागत असुन औषधोपचाराचा खर्च देखील अर्जदार क्र.१ हिची आईच करीत आहे. याउलटत गैरअर्जदार क्र.१ हा कृषी विभागात कृषी सहाय्यक अधिकारी म्हणून नोकरीवर आहे. तसेच गैरअर्जदार क्र.१ कडे मौजा वरुड येथे पाच एकर सुपिक जमीन असुन त्यापासून त्याला वर्षाकाठी पाच ते सात लाख उत्पन्न मिळते. म्हणुन अर्जदार क्र.१ हिने गैरअर्जदार क्र.१ यांच्याकडुन प्रत्येकी दरमहा रक्कम रु.५,०००/– आर्थिक सहाय्य मिळण्यासाठी विनंती केली आहे.

४. गैरअर्जदार यांनी त्यांचा खुलासा (नि.९) दाखल केला. गैरअर्जदार यांनी कथन केले की, त्यांचे लग्न अर्जदार क्र.१ सोबत नोंदणी पद्धतीने झाले असल्यामुळे सदर लग्नात कुठलाही खर्च झाला नाही. सदर लग्नसंबंधातून त्यांना दोन मुलीहोईपर्यंत त्यांचा संसार सुरळीत चालला. त्यानंतर त्यांनी अर्जदार क्र.१ च्या भावाला उसनवार दिलेले पैसे मागितले असता त्याने नकार दिला व तो निघून गेला. त्यानंतर अर्जदार क्र.१ हिने त्यांचेविरुद्ध पो.स्टे.ला रिपोर्ट दिला व नंतर माहेरी निघून गेली. दि.२२.०७.२०१७ रोजी ते अर्जदार क्र.१ हिच्या माहेरी त्यांना आणण्यासाठी गेले असता तिच्या माहेरच्या लोकांनी त्यांना अर्वाच्च भाषेत शिवीगाळ केली व हाकलून दिले व अर्जदार क्र.१ हिस पाठविण्यास नकार दिला. त्यामुळे त्यांनी वि.दि.न्या.व.स्तर, दर्यापुर येथे हिंदू विवाह कायदा कलम ९ प्रमाणे केस दाखल केली. परंतु अर्जदार त्या केसमध्ये हजर झाली नाही. त्यांनी भविष्याचा विचार करुन चांगल्या वागणुकीचा करारनामा लिहून दिला. त्यानंतर त्यांचा दोन वर्षापर्यंत संसार चांगला चालला. त्यानंतर त्यांच्यामध्ये परत शुल्लक कारणावरुन वाद होवून अर्जदार क्र.१ ही माहेरी निघून गेली. अर्जदार क्र.१ ची आई, बहिण व भाउ हे अर्जदार क्र.१ व तिच्या मुलींना जबरदस्तीने त्यांच्या वैयक्तीक स्वार्थाकरीता त्यांच्यापासून विभक्त करण्याचा प्रयत्न करीत आहे. ते अर्जदार क्र.१ हिस नांदविण्यास तयार आहेत. अर्जदार हे त्यांना सोडून वेगळे राहत असल्यामुळे ते प्रचंड मानसिक तनावात असुन त्यामुळे ते मानसिक तनावात आहेत. तसेच ते अस्थायी काम करीत असल्यामुळे त्यांना नियमित वेतन मिळत नाही. त्यांच्या कमाईवर त्यांचे आई–वडील सुद्धा अवलंबुन आहेत. करीता गैरअर्जदार क्र.१ यांनी सदरचा अर्ज खारिज करण्याची विनंती केली.

५. खालील वाद प्रश्न माझे विचारार्थ उपस्थित झाले. त्यांचे निष्कर्ष खाली नमुद विवेचनासह नोंदविण्यात येत आहे.

| क्र. | वाद प्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | गैरअर्जदार यांनी अर्जदारांवर कौटुंबिक हिंसाचार केला ही बाब अर्जदार हिने शाबीत केली आहे काय ? | होय |
| २. | कौटुंबिक हिंसाचार कायद्याप्रमाणे अर्जदार हि आर्थिक सहाय्य मिळण्यास पात्र आहे काय ? | होय |
| ३. | कोणता आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

वाद प्रश्न क्र.१ व २ करीता –

६. अर्जदार हिने आपल्या अर्जाच्या समर्थनार्थ स्वतःचा पुरावा शपथपत्र (निशाणी क्र.१५) दाखल केले. अर्जदार हिच्या साक्षीनुसार तिचे लग्न गै.अ.क्र. १ सोबत दि. २४.०५.२००६ रोजी झाले. लग्नाचा संपूर्ण खर्च म्हणून गैरअर्जदार क्र.१ याला रुपये ३१,०००/– देण्यात आले होते व आंधण म्हणून जीवनोपयोगी भेटवस्तु तसेच तिच्या आई–वडीलांनी तिला सोन्या–चांदीचे दाग–दागिने किंमत अंदाजे २०,०००/– चे दिले होते तसेच लग्नाचा एकूण खर्च २०,०००/– केला होता. लग्नानंतर ती गैरअर्जदारांकडे त्यांच्या एकत्र कुटुंबात नांदावयास गेली होती. त्यावेळी गैरअर्जदारांनी सुरुवातीचे पंधरा दिवस तिला चांगली वागणुक दिली. त्यानंतर गैरअर्जदार क्र.१ हा गैरअर्जदार क्र.२ व ४ च्या सांगण्यावरुन तिला त्रास देण्यास सुरुवात केली. गैरअर्जदार क्र.१ हा त्यावेळी धारणी येथे कृषी विभागामध्ये कृषी सेवक म्हणून कार्यरत असतांना तो तेथेच राहत होता. घरी आल्यानंतर गैरअर्जदार क्र.१ हा दारुच्या नशेत तिला मारहाण करीत होता व तिचेवर संशय घेवून तिला पाप लावित होता. ती गैरअर्जदार यांचेकडे नांदत असतांना लग्नाच्या सहा महिन्यामध्ये तिला शासकिय रुग्णालयात ए.एन.एम.सहाय्यक परिचारीका म्हणून काळशी येथील उपकेंद्र काळशी पि.एच.सी. दर्यापुरला नौकरी लागली त्यामुळे ती काळशी येथील शासकिय निवासस्थानामध्ये तिच्या ननंद रुपाली सोबत राहण्यास गेली. तिला नौकरी लागल्यानंतर गैरअर्जदार क्र.१ हा तिचेवर जास्तच संशय घेत होता व तिला पाप लावत होता. अशातच ती गैरअर्जदार क्र.१ पासून गर्भवती राहीली व तिने दि.०५.११.२००७ रोजी अर्जदार क्र.२ ला जन्म दिला. तिच्या प्रसुतीचा संपूर्ण खर्च तिच्या आई–वडीलांनीच केला. वर्ष २००८ मध्ये गैरअर्जदार क्र.१ ची बदली होवून ते दर्यापुर येथे आला. त्यावेळी अर्जदार क्र.१ हिने तिची बदली मौजा भामोद येक्ये करुन घेतल्यामुळे गैरअर्जदार क्र.१ हा तिच्यावर जास्तच संशय करु लागला.दि.११/०३/२००९ रोजी गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदार क्र.१ हिला चांगले वागणुकीचा करारनामा लिहून दिला. त्यानंतर गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदार क्र.१ हिस कोऱ्या कागदावर सही घेतली व तिला नोकरी सोडायला लावली. त्यानंतर अर्जदार क्र.१ हिने दि.१८/१२/२०१० रोजी पुन्हा अर्जदार क्र.३ हिस जन्म दिला. त्यानंतर अर्जदार क्र.१ ही गैरअर्जदार क्र.१ सोबत नविन घरात राहण्यास गेली असता गैरअर्जदार क्र. २ ते ४ दर्यापुर येथे येत होते व गैरअर्जदार क्र.१ ला

तिचेबद्दल भडकावून देत होते. त्यामुळे गैरअर्जदार क्र.१ हा दारु पिवून अर्जदार क्र.१ हिस मारहाण करीत होता. त्यामुळे अर्जदार क्र.१ ही जुन २०१४ मध्ये दोन्ही मुलींसही तिच्या माहेरी आली. त्यांनतर दि.१५.११.२०१४ रोजी पुन्ही गैरअर्जदार क्र.१ याने चांगल्या वागणुकीचे हमीपत्र लिहून दिले व त्यांना घरी घेवून गेला. त्यानंतर गैरअर्जदार क्र.१ हा पाच–सहा महिने माहेर का राहीली या कारणावरुन परत दारुच्या नशेत मारहाण करीत होता. दि.२५.११.२०१६ व २६.११.२०१६ रोजी अर्जदार क्र.१ हिला गैरअर्जदार क्र.१ याने बेदम मारहाण केली व अर्जदारांना कोंडून ड्युटीवर निघून गेला. त्यानंतर अर्जदार क्र.१ ही माहेरी निघून आली. गैरअर्जदार क्र.१ हा अर्जदार क्र.१ च्या माहेरी गेला व तेथे तिच्या आई–वडील व बहिण यांना शिवीगाळ केली व जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या. त्यामुळे अर्जदार क्र.१ हिने पो.स्टे. मानोरा येथे रिपोर्ट दिला. अर्जदार क्र.१ ही माहेरी राहत असुन अर्जदार क्र.२ व ३ ह्या शिकत आहेत. त्यांना शिक्षणाकरीता खर्च लागत असुन औषधोपचाराचा खर्च देखील अर्जदार क्र.१ हिची आईच करीत आहे. याउलटत गैरअर्जदार क्र.१ हा कृषी विभागात कृषी सहाय्यक अधिकारी म्हणून नोकरीवर आहे. तसेच गैरअर्जदार क्र.१ कडे मौजा वरुड येथे पाच एकर सुपिक जमीन असुन त्यापासून त्याला वर्षाकाठी पाच ते सात लाख उत्पन्न मिळते.

७. अर्जदार हिने तिच्या पुराव्याचे शपथपत्र निशाणी क्र.१५ दाखल केल्यानंतर गेरअर्जदार यांनी तिचा उलटतपास घेतला नाही. त्यामुळे अर्जदाराचा उलटतपास नाही असा आदेश झाल्यानंतर अर्जदार हिने तिला पुढे कोणताही पुरावा द्यायचा नाही अशी पुरशिस दाखल केली. त्यानंतर अर्जदार हिचा उलटतपास घेण्याऐवजी गैरअर्जदार यांनी त्याच्या पुराव्याचे शपथपत्र निशाणी क्र.५१ दाखल केले परंतु त्याच्या स्वतःच्या उलटतपासासाठी तो कधीही हजर राहिला नाही. त्यामुळे त्याचा पुरावा बंद करण्यात आला व ती सर्व बाब निशाणी क्र.१ वरील आदेशाने करण्यात आले. त्यामुळे अभिलेखावर केवळ अर्जदाराचा पुरावा आहे.

८. अर्जदार हिला शारिरीक व मानसिक त्रास झाल्याचे स्पष्ट होते. गैरअर्जदार क्र.१ ने तिचे पालन पोषणाची कोणतीही व्यवस्था केलेली नाही. दि.०९.०७.२०१८ रोजी अर्जदार क्र.१ हिला दरमहा रक्कम रुपये २,०००/– व अर्जदार क्र.२ व ३ यांना दरमहा प्रत्येकी अंतरीम पोटगी रक्कम रु.१,५००/– अर्ज दाखल तारखेपासून मंजुर करण्यात आलेले आहे.

९. कौटुंबिक हिंसाचार अधिनियम चे कलम २००३ नुसार कौटुंबिक हिंसाचाराची जी व्याख्या दिली आहे त्या व्याख्येनुसार शारिरीक, मानसिक, आर्थिक व भावनिक प्रकारचा हिंसाचार कौटुंबिक हिंसाचाराच्या व्याख्येत मोडतो. गैरअर्जदार यांनी अर्जदार हिचा शारिरीक, मानसिक, भावनिक तसेच आर्थिक छळ केल्याचे त्यांच्या पुराव्यातून स्पष्ट होते. अर्जदार ही गैरअर्जदार यांच्यापासून विभक्त राहत असल्याचे स्पष्ट होते. अर्जदार हिला गैरअर्जदार यांनी कौटुंबिक हिंसाचार केल्याचे सिद्ध होते. गैरअर्जदार क्र.१ हा शरीराने सुदृढ व धडधाकट व्यक्ती आहे. तसेच अर्जदाराच्या पालन पोषणाची नैतिक व कायदेशिर जबाबदारी गैरअर्जदार क्र.१ यांच्यावरच आहे त्यामुळे अर्जदार ही गैरअर्जदार क्र.१ यांच्याकडून उदरनिवाहाची रक्कम मिळण्यास पात्र आहे. त्यामुळे गैरअर्जदार क्र.१ यांनी अर्जदार क्र.१ हिला दरमहा रक्कम रुपये २,०००/– व अर्जदार क्र.२ व ३ यांना प्रत्येकी रक्कम रुपये २०००/– देण्याचा हुकूम प्राप्त परिस्थितीत न्यायोचित ठरेल. करीता वाद प्रश्न १ व २ चे उत्तर 'होकारार्थी' नोंदविले आहे.

<u>वाद प्रश्न क्र.३ करीता</u> –

१०. वाद प्रश्न क्र. १ व २ वरील निष्कर्षाअंती खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे :

## <u>आदेश</u>

१. अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२. गैरअर्जदार क्र.१ यांनी अर्जदार क्र.१ हिला दरमहा रक्कम रुपये २,०००/– (रुपये दोन हजार मात्र) व अर्जदार क्र. २ व ३ यांना प्रत्येकी दरमहा रक्कम रुपये २,०००/–(रुपये दोन हजार मात्र) निर्वाह भत्ता म्हणून अर्ज दाखल तारखेपासून देण्याचे आहे.

३. सदर न्यायनिर्णयाची प्रत्येकी एक साक्षांकित प्रत अर्जदार व गैरअर्जदार यांना मोफत द्यावी.

( सदरचा आदेश खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला. )

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by JAGDISH TULSIDAS KOREGAONKAR
Date: 2026.05.28 12:46:44 +0530

दिनांक : २८.०५.२०२६

(ज. तु. कोरेगांवकर )
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्यायालय क्र.१ ), मानोरा.

**प्रमाणपत्र**

मी हमी देते की, सदरच्या पी.डी.एफ. फाईलमधील मजकूर हा मुळ न्यायनिर्णयातील प्रत्येक शब्दानुसार बरोबर आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नाव | कु. आर. के. चव्हाण (श्रेणी–३) |
| न्यायालय | (श्री. ज. तु. कोरेगांवकर)<br>न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, मानोरा. |
| न्यायनिर्णय घोषीत दिनांक | २८.०५.२०२६ |
| न्यायीक अधिकारी यांनी सही केलेले दिनांक | २८.०५.२०२६ |
| न्यायनिर्णय अपलोड केलेले दिनांक | २८.०५.२०२६ |